# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 'लोकशाही निवडणुक व सुशासन' या विषयाच्या परीक्षेकरिताची नियमावली

१. सदर परीक्षेचे परिपत्रक/अभ्यासक्रम/स्वंय-अध्ययन साहित्य/नमुना प्रश्न/ऑडीओ क्लीप इत्यादी संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in // online syllabus या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. सदरची परीक्षा ही महाविद्यालयीन स्तरावर घेण्याची आहे. त्यामुळे सदर विषयाचा उल्लेख वेळापत्रकामध्ये करण्यात येणार नाही.

३. सदरची परीक्षा भाग-१ साठी सक्तीची असून ऑक्टोबर व मार्च या दोन्ही सत्रामध्ये आयोजित करावी. ऑक्टोबरमध्ये फ्रेश विद्यार्थ्याची परीक्षाचे आयोजन करावे व ऑक्टोबरमध्ये अनुत्तीर्ण व गैरहजर विद्यार्थ्यांची परीक्षाचे आयोजन मार्च मध्ये करावे.

४. महाविद्यालयाने त्यांच्या सोयीनुसार परीक्षा घ्यावी सदर विद्यार्थ्यांचे नांव, बैठक क्रमांक, PRN व ५० पैकी प्राप्त गुण अशा नमुन्याप्रमाणे यादी तयार करण्यात यावी.संगणकप्रणाली मध्ये बैठक क्रमांकानुसार नोंदी कराव्यात व PDF अहंवाल संबंधित परीक्षा विभागात जमा करावा.

५. याविषयाचे गुण गुणतक्त्यामध्ये दर्शविले जाणार नाहीत. गुणतक्त्यामध्ये स्वतंत्र विषय दाखवून त्यासमोर फक्त (P/F) असा उल्लेख केला जाईल.

६. प्रश्नपत्रिकाचे स्वरूप हे MCQ (Multiple Choice Question पध्दतीचे असेल महाविद्यालयांना एकूण ७५ नमुना प्रश्न दिले आहेत त्यातील २५ प्रश्नांची ५० गुणांची प्रश्नपत्रिका तयार करून महाविद्यालयाने परीक्षेचे आयोजन करावे. दिलेल्या ७५ प्रश्नाखेरीज महाविद्यालय अभ्यासक्रमावर आधारित अधिकच्या प्रश्नांचा समावेश करू शकते. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यास किमान ४० टक्के (२० गुण) प्राप्त होणे आवश्यक आहे.

७. विद्यार्थी विषयात उत्तीर्ण झाला नाही तरी तो सत्र ६ पर्यत जाईल विद्यार्थ्यांना गुणतक्ता दिला जाईल परंतू सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय विद्यार्थी पदवी प्रमाणपत्राकरिता पात्र होणार नाही. सदरच्या विषयात उत्तीर्ण न झाल्यास भाग ३ ला प्रवेश देण्यासाठी संगणकीय प्रणालीमध्ये तशा स्वरूपाचा बदल करण्यात येणार आहे.

८. सदर विषयाची परीक्षा अंतर्गत सत्रक्रमाप्रमाणे असल्याने उत्तीर्ण होण्यासाठी दंडकाचे लाभ तसेच दंडक १०६(ब) नुसार याविषयाची फोटोकॉपी/फेरतपासणी/गुणपडताळणी व इतर अनुषांगिक लाभ देय असणार नाहीत. महाविद्यालय स्तरावर टर्मवर्क नुसार परीक्षा घ्यावयाची असल्यामुळे विद्यापीठीय उत्तरपत्रिका देण्यात येणार नाही..

९. सदरची परीक्षा उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना प्राचार्यांचे स्वाक्षरीने प्रमाणपत्र देण्यात यावे. सदरचे प्रमाणपत्र विद्यापीठाकडून प्राप्त नमून्याप्रमाणे महाविद्यालयाने तयार करून घेण्याचे आहे.

१०. महाविद्यालयाकडील ७५ % परीक्षा फीच्या रक्कमेमधून सदर परीक्षेसाठीचा होणारा खर्च करणेचा आहे. उदा: B.A B.Com. B.Sc .B.C.A.B.B.A उर्वरीत सर्व महाविद्यालयांनी त्यांना देण्यात येणा-या परीक्षा खर्चाच्या तसलमात रक्कमेतून सदर परीक्षेसाठीचा खर्च करणेचा आहे.

११. दूरशिक्षण विभागाकडील विद्यार्थी ज्या केंद्रावर अध्ययनासाठी प्रवेशित आहे त्या अभ्यासकेंद्राने प्रवेशित विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे आयोजन करावयाची आहे.

ठिकाण: कोल्हापूर
दिनांक : ०९-०२-२०१८

मा.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ